**भारतीय हवामान खाते**

**कृषि हवामान प्रभाग, पुणे ४१११००५**

**महाराष्ट्र राज्यासाठी कृषी हवामान सूचना पत्रक ५८ / २०२४**

**(सूचना पत्रकात दिलेला कृषी सल्ला राज्यातील कृषी हवामान केंद्रे यांच्याकडून प्राप्त झालेला आहे)**

**दिनांक : १९.०७.२०२४**

**<u>ईशारा</u>**

- **१९ जुलै :**
  - कोकण व विदर्भात काही ठिकाणी जोरदार ते अति जोरदार तर तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे.
  - मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार ते अति जोरदार तर एक -दोन ठिकाणी मुसळधार पावसाची तसेच मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे.
  - विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे.
- **२० जुलै :**
  - कोकण व विदर्भात काही ठिकाणी जोरदार ते अति जोरदार तर तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे.
  - मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार ते अति जोरदार तर एक -दोन ठिकाणी मुसळधार पावसाची तसेच मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोरदार ते अती जोरदार पावसाची शक्यता आहे.
  - विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे.
- **२१ जुलै :**
  - विदर्भ, कोकण व मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.
  - विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे.
- **२२ जुलै :**
  - कोकण व मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.
  - विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.
  - विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे.
- **२३ जुलै :**
  - कोकण व मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.
  - विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे.

**<u>कृषि सल्ला</u>**

- तुरळक ठिकाणी जोरदार/अति जोरदार/मुसळधार पावसाची शक्यता लक्षात घेता, शेतकरी बांधवांना सल्ला देण्यात येतो की,
  - कोकणातील रत्नागिरी, रायगड व पालघर जिल्ह्यात तसेच मध्य महाराष्ट्रातील पुणे, कोल्हापूर व सातारा जिल्ह्यातील घाट भागात व विदर्भातील चंद्रपूर जिल्ह्यात भात, नाचणी आणि भाजीपाल्याची लागवड पुढे ढकलावी.
  - भात, तूर, उडीद, मुग, मका, सूर्यफूल, भुईमूग, सोयबीन या खरीप पिकांतून तसेच भाजीपाला व फळ

बागांतून अतिरिक्त पाणी बाहेर काढण्यासाठी योग्य व्यवस्था करावी,

- ➢ कोकण, विदर्भ व मध्य महाराष्ट्रातील घाट भागात खतांचा वापर करणे तसेच रासायनिक किटकनाशकांची फवारणी करणे पुढे ढकलावे,

- विदर्भात, तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता, जनावरांना गोठ्यात बांधावे.

**दिनांक १६ जुलै ते १८ जुलै २०२४ या काळातील पावसाचा सारांश :**

| दिनांक | १६.०७.२०२४ | १७.०७.२०२४ | १८.०७.२०२४ |
|---|---|---|---|
| **कोकण** | बहुतांश | बहुतांश | बहुतांश |
| **मध्य महाराष्ट्र** | काही | काही | काही |
| **मराठवाडा** | बहुतांश | बऱ्याच | काही |
| **विदर्भ** | बहुतांश | बहुतांश | बहुतांश |

**राज्यातील हवामान घटकांचे वितरण व हवामानाचा सारांश (दिनांक १६ जुलै ते १८ जुलै २०२४)**












**पुढील ५ दिवसांतील पावसाच्या वितरणाचा अंदाज/पूर्वानुमान :**

| दिनांक | १९.०७.२०२४ | २०.०७.२०२४ | २१.०७.२०२४ | २२.०७.२०२४ | २३.०७.२०२४ |
|---|---|---|---|---|---|
| **कोकण** | बहुतांश | बहुतांश | बहुतांश | बहुतांश | बहुतांश |
| **मध्य महाराष्ट्र** | बऱ्याच | बऱ्याच | बऱ्याच | बऱ्याच | बऱ्याच |
| **मराठवाडा** | बऱ्याच | बहुतांश | बऱ्याच | काही | काही |
| **विदर्भ** | बहुतांश | बहुतांश | बहुतांश | बहुतांश | बऱ्याच |

*** सविस्तर हवामान अंदाज सूची १ (Annexure I) मध्ये आहे.**

**महाराष्ट्रातील विविध कृषी हवामान केंद्रे (ए.एम.एफ.यू.) यांनी जारी केलेला कृषी हवामान सल्ला.**

**कोकण हवामान उपविभाग -**

**(कृषी सल्ला, प्रादेशिक कृषी हवामान केन्द्र दापोली, (जि. रत्नागिरी, रायगड, ठाणे) व कृषी हवामान केन्द्र, मुळदे (जि. सिंधुदुर्ग, जि. पालघर) यांचे कडून प्राप्त झाल्यानुसार)**

- झालेला पाऊस तसेच तुरळक ठिकाणी अपेक्षित जोरदार ते अतिजोरदार व एक दोन ठिकाणी मुसळधार पाऊस लक्षात घेता,
  - ➢ रत्नागिरी, रायगड व पालघर जिल्ह्यात भात, नाचणी तसेच भाजीपाला पिकांची पुर्नलागवड पुढे ढकलावी.

- ➢ खतांचा वापर आणि रासायनिक फवारणी पुढे ढकलावी,
- ➢ हळद, भुईमूग पिकातून तसेच भात व नाचणी रोपवाटिकातून व फळबागा व भाजीपाला पिकांतून अतिरिक्त पाणी बाहेर काढावे,
- ➢ पुर्नलागवड केलेल्या भात शेतात पाण्याची पातळी ५ सेमी पर्यंत ठेवावी,
- ➢ नवीन लागवड केलेल्या आंबा, काजू, नारळ व सुपारी रोपांना काठीच्या / बांबूच्या सहय्याने आधार द्यावा,
- ➢ वेलवर्गीय भाजीपाला पिकांना काठीच्या / बांबूच्या सहय्याने आधार द्यावा.
- सिंधुदुर्ग व ठाणे जिल्ह्यात भात, नाचणी व भाजीपाला रोपवाटीकेची पुर्नलागवड सुरू ठेवावी.

**मध्य महाराष्ट्र हवामान उपविभाग -**

**(कृषी सल्ला, प्रादेशिक कृषी हवामान केन्द्र, पुणे, (जि. पुणे, जळगाव, सोलापूर) यांचे कडून प्राप्त झाल्यानुसार)**

- पुणे जिल्ह्यात घाट भागात तुरळक ठिकाणी जोरदार/अतिजोरदार पावसाची शक्यता लक्षात घेता,
- ➢ भात, नाचणी व भाजीपाला पिकांची लावणी पुढे ढकलावी,
- ➢ भात रोपवाटिका, फळबागा आणि भाजीपाला पिकातून अतिरिक्त पाणी बाहेर काढण्यासाठी योग्य व्यवस्था करावी,
- ➢ लागवड केलेल्या केळी पिकाला काठीच्या / बांबूच्या सहय्याने आधार द्यावा.
- खरीप पिकामध्ये मशागतीयोग्य परिस्थिती असल्यास आंतरमशागतीची कामे व नांग्या भरण्याचे काम पावसाची उघडीप पाहून करावी.
- मध्य हंगामी (आडसाली) ऊसाच्या लागवड पावसाची उघडीप पाहून करावीत.
- सध्याच्या ढगाळ व दमट हवामानामुळे कापूस पीक पेरणी होऊन १५ दिवसाच्या वर झाले असल्यास कापूस पिकावरील रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी पावसाची उघडीप बघून करावी.

**(कृषी सल्ला, प्रादेशिक कृषी हवामान केन्द्र, राहुरी (जि. अहमदनगर, धुळे, नंदुरबार) यांचे कडून प्राप्त झाल्यानुसार)**

- मुग, उडीद, मका, बाजरी, भुईमूग या खरीप पिकांत अंतरमशागतीची कामे पावसाची उघडीप पाहून करावी तसेच गरजेनुसार विरळणी आणि नांगे भरण्याची कामे करून घ्यावीत.
- नंदुरबार जिल्ह्यात आडसाली उसाची लागवड करावी.

**(कृषी सल्ला, प्रादेशिक कृषी हवामान केन्द्र, कोल्हापूर (जि. कोल्हापूर, सांगली व सातारा) यांचे कडून प्राप्त झाल्यानुसार)**

- घाट भागात तुरळक ठिकाणी जोरदार ते अति जोरदार तर एक-दोन ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता लक्षात घेता,
- ➢ कोल्हापूर आणि सातारा जिल्ह्यातील घाट भागात भात, नागली आणि भाजीपाल्याची लागवड पुढे ढकलावी.
- ➢ भात पिकातील तसेच फळबागा व भाजीपाला पिकांतील अतिरिक्त पाणी बाहेर काढण्यासाठी योग्य व्यवस्था करावी,
- भात खाचरातील पाण्याची पातळी रोप लागणीपासून रोपे स्थिर होईपर्यंत १ ते २ से.मी. ठेवावी.
- मका, सोयाबीन व भुईमूग पिकात ज्या ठिकाणी उगवण झाली नसल्यास व गरज भासल्यास पीक उगवणीनंतर त्वरित पावसाची उघडीप पाहून नांग्या भराव्यात.
- सांगली, कोल्हापूर व सातारा जिल्ह्याच्या पूर्व भागात खरीप हंगामातील पिकांतील आंतर मशागतीची कामे जमिनीत वाफासा स्थिति असताना व पावसाची उघडीप पाहून करावी.
- हळद लागवडीस ४५ दिवस झाले असल्यास नत्र खताचा पहिला हप्ता (१०० किलो नत्र प्रती हेक्टरी ) द्यावा.
- द्राक्ष पिकांच्या वेलीवरील भुरी बुरशीच्या नियंत्रणासाठी बोर्डो मिश्रण @ १.५ - २ ग्रॅम प्रती लिटर स्वच्छ हवामानात फवारणी करावी.

**(कृषी सल्ला, प्रादेशिक कृषी हवामान केन्द्र, इगतपुरी (जि. नाशिक) यांचे कडून प्राप्त झाल्यानुसार)**

- भात, नाचणी, वरई व भाजीपाला पिकांची लावणी सुरू ठेवावी.
- बाजरी, मका, भुईमूग आणि सोयाबीनमध्ये पेरणीनंतर कोळपणी अथवा खुरपणी स्वच्छ हवामानात करावी.
- पूर्वेकडील भागात मका, सोयाबीन आणि भुईमूग पिकात पीक उगवणीनंतर ज्या ठिकाणी उगवण झाली नसल्यास व गरज भासल्यास पावसाची उघडीप पाहून नांग्या भराव्यात.
- भात रोपवाटीकेत रोपांच्या जोमदार वाढीसाठी पेरणीनंतर १५ दिवसांनी प्रति गुंठा ५०० ग्रॅम नत्र खत द्यावे.

**मराठवाडा हवामान उपविभाग विभाग -**

**(कृषी सल्ला, प्रादेशिक कृषी हवामान केन्द्र, परभणी (जि. परभणी, जालना, हिंगोली, बीड, लातूर, नांदेड, छत्रपती संभाजी नगर, धाराशीव) यांचे कडून प्राप्त झाल्यानुसार)**

- पुढील ४८ तासांत नांदेड, लातूर आणि हिंगोली जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी अपेक्षित जोरदार पाऊस लक्षात घेता, खरीप पिके, फळबागा व भाजीपाला यातील अतिरिक्त पाणी बाहेर काढण्याची व्यवस्था करावी.
- जमिनीत वापसा स्थिति असताना कापूस, तूर, उडीद व मुग या पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे पावसाची उघडीप पाहून करावी.
- ऊस पिकावर खोड किडीचा प्रादूर्भाव दिसून आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस 20 % @ 25 मिली किंवा क्लोरॅट्रानोलीप्रोल 18.5% @ 4 मिली प्रति 10 लीटर पाण्यात मिसळून फवारणी पावसाची उघाड बघुन करावी.
- ढगाळ वातावरण व वाढलेल्या अद्रेतेमुळे भूईमूग पिकात मावा, फुलकिडे व रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव वाढला असून त्यांच्या व्यवस्थापनासाठी क्विनॉलफॉस २५% ई.सी. @ २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघाड बघुन फवारणी करावी.

**विदर्भ हवामान उपविभाग :**

**पश्चिम विदर्भ :**

**(कृषी सल्ला, प्रादेशिक कृषी हवामान केंद्र अकोला, (जि. अकोला, यवतमाळ, वर्धा, अमरावती, वाशीम, बुलढाणा ) यांचे कडून प्राप्त झाल्यानुसार)**

- तुरळक ठिकाणी जोरदार ते अती/ जोरदार पावसाची शक्यता लक्षात घेता, शेतकरी बांधवांना सल्ला देण्यात येतो की उडीद, मुग, सोयाबीन, तूर, कापूस, भाजीपाला आणि फळबागांमधील अतिरिक्त पाणी काढून टाकण्याची व्यवस्था करावी.
- जमिनीत वापसा स्थिती असताना मुग, उडीद, सोयाबीन, तूर, कापूस व मका यांसारख्या खरीप पिकांमध्ये आवशकतेनुसार पावसाची उघडीप पाहून आंतरमशागत करून पीक तनविरहीत ठेवावे.
- ज्या ठिकाणी कपाशी पिक अति पाण्यामुळे मुलुल झाली आहेत अश्या ठिकाणी कॉपर ओक्सीक्लोराईड ५० टक्के डब्लूपी @ २५ ग्रॅम + युरिया @ १०० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून किंवा कोबाल्ट ओक्सीक्लोराईड @ ०.१ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून प्रधुर्भावग्रस्त ठिकाणी पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी.
- सततच्या पाऊसामुळे मुग व उडीद पिकावरील भूरी रोगाच्या नियंत्रणासाठी डिनोकॉप @ १० मिली किंवा गंधक @ ३० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी.

**पूर्व विदर्भ :**

**(कृषी सल्ला, प्रादेशिक कृषी हवामान केन्द्र, सिंदेवाही, (जि. चंद्रपूर, गोंदिया, नागपूर, भंडारा, गडचिरोली) यांचे कडून प्राप्त झाल्यानुसार)**

- तुरळक ठिकाणी जोरदार / जोरदार ते अती जोरदार तर एक-दोन ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता लक्षात घेता,
- ➢ चंद्रपूर जिल्ह्यातील भात आणि भाजीपाल्याची लागवड पुढे ढकलावी,
- ➢ सोयाबीन, कापूस, तूर, भाजीपाला, भाताची रोपवाटिका, लावलेली भातशेती आणि फळबागांतील अतिरिक्त पाणी बाहेर काढण्याची व्यवस्था करावी.
- ➢ खतांचा वापर आणि रासायनिक फवारणी पुढे ढकलावी,
- धान रोपे २१ ते २५ दिवसांची झाले असल्यास रोवणीस सुरुवात करावी, धान पुर्नलागवड केलेल्या शेतात पाण्याची पातळी २ ते ३ से. मी. पर्यंत नियंत्रित करून ठेवावी.
- सोयाबीन, कापूस, तूर पिकांत वाफसा आल्यानंतर पावसाची उघडीप पाहून आवशकतेनुसार आंतरमशागत करून पीक तनविरहीत ठेवावे.

# Annexure I

## INDIA METEOROLOGICAL DEPARTMENT

## NWP MODELS BASED DISTRICT LEVEL WEATHER PREDICTION

## ISSUED ON: 19.07.2024

## VALID TILL 08:30 IST OF THE NEXT 5 DAYS

